## प्रकरण सहावे

## गडहिंग्लज तालुक्यातील पक्षीय राजकारण : एक टीकात्मक अभ्यास

# प्रकरण सहावे

## गडहिंग्लज तालुक्यातील पक्षीय राजकारण : एक टीकात्मक अभ्यास

### स्थानिक राजकारणाचे स्वरूप, गटबाजी आणि स्थानिक सत्ताकेंद्राचे महत्व -

भारतातील स्थानिक राजकारणाचा अभ्यास करीत असताना असे स्पष्ट होते की, स्वातंत्र्योत्तर काळापासून ते १९६७ पर्यंत केंद्र आणि राज्य पातळीवर कॉंग्रेस पक्ष प्रभावी होता. स्थानिक पातळीवरही कॉंग्रेस पक्षाचाच प्रभाव होता. महाराष्ट्रात सन १९६२ पासून पंचायत राज्य संस्थांचा प्रयोग सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी सुरु झाल्यानंतर कॉंग्रेस प्रबळ ठरला. विविध सहकारी संस्था, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती यातून नवे ग्रामीण नेतृत्व पुढे येऊ लागले. या माध्यमांच्याद्वारे ग्रामीण भागात परिवर्तन होऊ लागले. तसेच नवीन नेतृत्वाचा विकास होऊ लागला. वरील संस्थांमधून स्थानिक पातळीवरील सत्ताकेंद्राची निर्मिती झाली. या सत्ताकेंद्रामधून पुढे येणारे नेतृत्व स्वतःच्या ताब्यात व स्वतःच्या गटाच्या ताब्यात जास्तीत जास्त सत्तास्थाने ठेवण्याचा प्रयत्न करु लागले. यातूनच त्यांच्यात परस्परांतील स्पर्धा सुरु झाल्या. यामुळे गटबाजीला बरेच खाद्य मिळाले. राजकारणाला विकृत वळण लागले. या स्पर्धेतूनच आपला प्रभाव कायम ठेवण्यासाठी राजकीय पक्ष, तत्वे, ध्येयधोरणे इत्यादी गोष्टींना गौण स्थान प्राप्त झाले. गटाच्या ताब्यात असणाऱ्या सत्तास्थानावरूनच त्या राजकीय गटाचे राजकारणातील महत्व कमी अधिक ठरु लागले. यातूनच गटबाजी, वैयक्तिक हेवेदावे, संघर्ष यांच्यासाठी राजकीय सत्तास्थानांचा उपयोग केला जाऊ लागला. विकेंद्रीकरणाच्या उद्देशाने निर्माण केलेल्या संस्था या स्थानिक गटाच्या

राजकारणाचे अड्डे बनल्या. ही सत्तास्थाने स्वत:च्या गटाच्या ताब्यात ठेवण्याचे राजकारण खेळले जाऊ लागले. नागरिकांच्या विचारांना, त्यांच्या सुखसोयींना गौणत्व प्राप्त झाले. ही परिस्थिती केवळ स्थानिक पातळी-वरच निर्माण झाली असे नाही तर केंद्र, राज्यपातळीपासून पक्षांतर्गत गट, गटराजकारण व व्यक्तिगट या सर्वांनीच मतांसाठी सत्तेचा उपयोग करण्याचे कार्य सुरु केले.

महाराष्ट्राच्या राजकारणावर पंचायती संस्था व सहकारी संस्था आजही वर्चस्व गाजवितात. शासनात सत्तास्थानी येणारी मंडळी पाहिली म्हणजे हे सहज लक्षात येते. विधीमंडळात साखर कारखान्याचा चेअरमन, बराच काळ जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भूषिविलेली व्यक्ती, नगराध्यक्ष अशा व्यक्ती आमदार म्हणून निवडून येतात. नंतर त्यापैकी काहींचा मंत्रीमंडळात समावेश होतो. पंचायती राज्यामुळे शेतीप्रधान, जातीप्रधान नेतृत्वाला चालना मिळाली; आजही ग्रामीण राजकारण या दोन केंद्रा-भोवती फिरत आहे. स्थानिक राजकारणात सत्ताकेंद्रे महत्वाची असतात. कारण त्या सत्ता केंद्राच्या साहयाने प्रत्येक पुढारी आपला राजकीय प्रभाव जास्तीत जास्त वाढवीत असतो. राज्यस्तरावरील नेतृत्व अशा गटबाजीस प्रोत्साहन देत असते. कारण या गटाच्या साहयाने राजकारणाच्या सर्व क्षेत्रात प्रवेश करावयास संधी गटबाजीमुळे राज्यस्तरावरील नेतृत्वास मिळत असते. पण ग्रामीण आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी लोकशाही रुजविणे, सहकार्य वाढीस लावणे, विकासाला गती देणे, नेतृत्व पुरविणे, राजकीय सहभाग वाढीस लावणे या दृष्टीने बरेच कार्य केले आहे. असे असले तरी आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, याद्वारे निर्माण झालेले नेतृत्व केवळ गटबाजी करुन पुढे आले नव्हते तर स्थानिक विकास कामांना गती देऊन स्थानिक राजकीय संस्थांचा वापर करुन हे नेतृत्व पुढे आले होते.

गडहिंग्लज तालुक्याचा राजकारणाचा अभ्यास करीत असतांना ही गोष्ट लक्षात येते.

## स्थानिक राजकारण आणि नगरपालिका

गडहिंग्लज नगरपालिकेत बराच काळपर्यंत कॉंग्रेस अंतर्गत नगरविकास आघाडीकडे सत्ता होती. डॉ. शिवलिंग पाळी यांनी तब्बल २२ वर्षे नगराध्यक्ष पद भूषविले. १९७४ साली कॉंग्रेस विरोधी जनता आघाडीने नगरपालिकेत बहुमत मिळविले. परंतु शासनाने थेट जनतेमधून नगराध्यक्ष निवडीचे धोरण स्वीकारल्यामुळे नगराध्यक्ष होण्याची संधी पालिकेत बहुमत नसतानाही कॉंग्रेसचे डॉ. शिवलिंग पाळी यांना मिळाली. सन १९८५ साली झालेल्या निवडणुकीत सत्तांतर होऊन जनता पक्ष पुरस्कृत आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील जनता आघाडीने सत्ता प्रस्थापित केली. पालिकेत दरवर्षी नगराध्यक्ष निवडीची परंपरा आमदार शिंदे यांनी यशस्वीपणे राबविली. नोव्हेंबर, १९९१ मध्ये झालेल्या निवडणुकीत कॉंग्रेसप्रणित राजर्षि शाहू नगर विकास आघाडीने सत्ता प्रस्थापित केली. या नंतरच्या काळात प्रत्येक वर्षी नगराध्यक्ष निवडीची परंपरा खंडीत झाली. नगरपालिकेच्या विविध निवडणुकीत अपक्ष उमेदवारांना विशेष संधी मिळाली नाही असे दिसते. नगरपालिकेच्या राजकारणात १९८५ नंतरच्या काळात कॉंग्रेस पक्षाला तुल्यबळ विरोधी असा जनता पक्ष नगर पालिकेत निर्माण झालेला आढळतो. नगरपालिकेत प्रशासकीय, रचनात्मक व जबाबदारीची अनेक स्थित्यंतरे झाल्याचे आढळते. प्रशासकीय राजवटीचा अल्पसा काळ वगळता बाकीचा सर्व कालावधी नगरपालिका लोकप्रतिनिधींच्या हाती असलेली दिसते. वाढत्या लोकसंख्येबरोबर गडहिंग्लज शहराचाही विस्तार वाढला आहे. स्वातंत्र्यानंतर सर्वांना मतदानाचा अधिकार मिळाला. लोकनियुक्त नगरसेवकांना शहर विकासाच्या विविध योजना राबवाव्या लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळात लोक-

कल्याणकारी राज्याच्या स्वीकारामुळे नगरपालिकेची जबाबदारी वाढली. शहर विकासासाठी नगरपालिकेचे स्थान आणि त्यातील राजकारण महत्वपूर्ण असते एवढे मात्र निश्चित आहे. अशा स्थानिक संस्था या ख-या लोकशाहीच्या शाळाच होत.

गडहिंग्लज नगरपालिकेच्या गेल्या १० वर्षांच्या इतिहासाचा जर आपण आढावा घेतला तर आपल्या असे लक्षात येईल की, तालुक्याच्या स्थानिक राजकारणाचा नगरपालिकेच्या राजकारणावर मोठ्या प्रमाणा-मध्ये परिणाम होतो. डॉ. शिवलिंग घाळी यांच्या राजकारणामध्ये त्यांनी नगरपालिकेमध्ये केलेल्या कार्याची भूमिका महत्वाची ठरली. कारण ते दोनवेळा विधान सभेवर गडहिंग्लज शहरातील मतदारांच्या भरघोस पाठिंब्यावर निवडून आले होते. जनता दलाचे या तालुक्यात थोडेबहुत काम होते. त्याचा उपयोग श्रीपतराव शिंदे यांना झाला. १९८५ च्या विधान सभा निवडणुकीत त्यांचा विजय झाल्यानंतर गडहिंग्लज नगरपालिकेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि त्यात ते ब-याच प्रमाणात यशस्वी ठरले. आमदार झाल्यानंतर त्या पदाचा वापर करून श्रीपतराव शिंदे यांनी नगरपालिकेवर आणि गडहिंग्लज साखर कारखान्या-वरही आपले वर्चस्व काही वर्षे प्रस्थापित केले. तालुक्यामध्ये कॉंग्रेस पक्षाची मुळे खोलवर रूजलेली असली तरी त्यात तीन गट असल्यामुळे आणि ते गट एकमेकांच्या विरोधी काम करीत असल्यामुळे श्रीपतराव शिंदे यांना स्थानिक राजकारणात यश मिळाले. पण या गटांच्यामध्ये फेरजुळणी झाल्यानंतर श्रीपतराव शिंदे यांच्या राजकारणाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या.

## श्रीपतराव शिंदे यांचा उदय

गडहिंग्लज तालुका हा कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. तालुक्यातील अनेक संस्था कॉंग्रेस पक्षाकडेच आहेत. परंतु तालुक्यातील

काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजीने अनेकवेळा डोके वर काढले आहे. त्यामुळे हा तालुका काँग्रेसचा बालेकिल्ला असूनही वारंवार विरोधी पक्षाच्या उमेदवारांना आमदार होण्याची संधी मिळत आली आहे. जनता पक्षाच्या उदयानंतर श्रीपतराव शिंदे यांचे नेतृत्वही जोमाने उदयास आले. काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजीमुळे काँग्रेस पक्षाचा प्रभाव कमी झाला होता. सन १९७८ मध्ये श्रीपतराव शिंदे यांनी प्रथम विधानसभेची निवडणूक लढविली. त्यावेळी त्यांना चांगली मते मिळाली. त्यानंतरच्या काळात त्यांचे तालुका राजकारणात हळूहळू महत्व प्रस्थापित होऊ लागले. १९८० साली पुन्हा विधान-सभेची निवडणूक लढविली. परंतु या दोन्ही निवडणुकीत काँग्रेस (आय) चे डॉ. शिवलिंग घाळी विजयी झाले. परंतु १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत जनता दलाचे उमेदवार म्हणून श्रीपतराव शिंदे यांचा विजय झाला. गडहिंग्लज तालुका राजकारणात त्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. श्रीपतराव शिंदे यांच्या नव्या नेतृत्वाच्या उदयामुळे तालुका राजकारणास नवी कलाटणी मिळाली.

## श्रीपतराव शिंदे यांच्या विजयाची कारणे

डॉ. एस्.एस्. घाळी यानी सतत दोनवेळा आमदार म्हणून निवडून येऊन गडहिंग्लज तालुक्याचे नेतृत्व केले. सतत तिस-यावेळी काँग्रेस (आय) पक्षामार्फत उमेदवारी मिळूनही काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजीमुळे त्यांना पराभव पत्करावा लागला. सन १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत गडहिंग्लज तालुक्यात महत्वपूर्ण सत्तांतर होऊन अॅड. श्रीपतराव शिंदे विजयी झाले. त्यांच्या विजयाची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) गडहिंग्लज विधानसभा मतदार संघाचा स्वातंत्र्यानंतर इतिहास पडताळता काँग्रेस अंतर्गत लाथाळीने विरोधी पक्षाच्या उमेदवारास अधून मधून आमदार होण्याची संधी मिळाली आहे.

२) तालुक्याच्या राजकारणात विरोधी पक्षांचा विचार करावयाचा तर जनता पक्ष सर्व खेड्यात पोहचलेला आहे. श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या विविध प्रश्नावर सतत चळवळी करून आपली प्रतिमा चांगली राखली आहे.

३) डॉ. शिवलिंग पाळी सलग तिसऱ्या वेळी निवडणूक लढवित होते. त्यामुळे मतदारात नाराजी होती आणि श्रीपतराव शिंदे यांच्याबद्दल सहानुभूती होती. त्यामुळे कॉंग्रेस (आय) पक्षाला पराभव स्वीकारावा लागला.

४) सन १९८५ पासून गडहिंग्लज तालुका पाणीप्रश्न जोरदारपणे चर्चेत आला. निवडणुक प्रचाराचा मुख्य विषय "रामतीर्थ धरण" करण्यात येऊन श्रीपतराव शिंदे यांनी निवडणूक जिंकली. पाणी प्रश्नावर जनतेच्या भावना किती तीव्र होत्या हेच श्रीपतराव शिंदे यांच्या विजयाने दाखवून दिले.

५) डॉ. शिवलिंग पाळी यांच्या विरोधी ॲड. श्रीपतराव शिंदे यांनी सरळ लढत दिली होती. सर्व विरोधी पक्ष शिंदे यांच्या बाजूने होते. कॉंग्रेस (एस्) चे श्री. बाबासाहेब कुपेकर गट त्यांच्याबरोबर होता. पुलोद आघाडीचे उमेदवार म्हणून शरद पवारही त्यावेळी श्रीपतराव शिंदे यांच्या प्रचारासाठी येऊन गेले होते. त्याचाही प्रभाव जनतेवर पडला होता.

६) गडहिंग्लज तालुक्यामध्ये डॉ. शिवलिंग पाळी, श्री. नागाप्पाण्णा बटकडली आणि बाबासाहेब कुपेकर यांच्यात कायमस्वरूपी गटबाजी होती. या गटबाजीचाही निवडणूक निकालावर परिणाम झाला.

७) डॉ. शिवलिंग पाळी यांनी सलग दोन वेळा आमदार म्हणून निवडून जाऊनही सन १९७८ च्या निवडणुकीनंतर १९८० साली पुन्हा मुदतपूर्व निवडणुका घेण्यात आल्या. अल्पकाळ नेतृत्व करण्याची संधी मिळाल्यामुळे तालुक्याच्या विकासासाठी त्यांना भरीव कार्य करता आले नाही.

थोडक्यात या निवडणुकीच्या निमित्ताने तालुक्याचा विकास व्हावा आणि नवीन नेतृत्वाला संधी मिळावी म्हणून अॅड. श्रीपतराव शिंदे यांना जनतेने निवडून दिले आणि गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात १९८५ साली महत्वपूर्ण बदल झाला. नव्याने आमदार म्हणून प्रतिनिधित्व करावयास मिळाल्यामुळे श्रीपतराव शिंदे यांना आपले स्थान बळकट करण्याची व प्रभाव वाढविण्याची संधी मिळाली. ही निवडणूक गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाला कलाटणी देणारी ठरली. तालुक्याच्या राजकारणात बदल होऊन श्रीपतराव शिंदे यांचे नवे नेतृत्व उदयास आले.

## पक्षीय राजकारण आणि सहकारी साखर कारखाना

गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याचे राजकारण गडहिंग्लज तालुक्याच्या पक्षीय राजकारणामध्ये पूर्णत: मिसळलेले होते आणि तालुक्याच्या राजकारणामध्ये होणाऱ्या बदलाचे प्रतिबिंब साखर कारखान्याच्या राजकारणात पडलेले आपणास दिसते. या राजकारणाला कॉंग्रेस पक्षांतर्गत चाललेल्या गटबाजीच्या राजकारणाचेही परिमाण होते. सुरवातीच्या काळात श्री. आप्पासाहेब नलवडे यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याची वाटचाल झाली. पण १९८८ नंतर कॉंग्रेसमधील दोन गट कुपेकर आणि हत्तरकी यांनी विरोधी आमदार श्रीपतराव शिंदे यांच्याशी हातमिळवणी केली. त्यामुळे त्यांच्या शेतकरी पॅनेलचा विजय झाला. आमदार श्रीपतराव शिंदे अडीच वर्षे या कारखान्याचे अध्यक्ष होते. त्यांच्या कारकिर्दीत अनेक नव्या योजना त्यांनी रेटल्या. उसाला किफायतशीर भाव दिला. पण १९९३ च्या निवडणुकीत हत्तरकी गट वेगळा झाला आणि कुपेकर-नलवडे गट एकत्र आले. या निवडणुकीत हत्तरकी गटाला १२०० मते मिळाली. या विभागणीमुळे श्रीपतराव शिंदे यांच्या शेतकरी आघाडीचा पराभव झाला आणि आप्पासाहेब नलवडे यांचा गट पुन्हा सत्तेवर आला. तालुक्याच्या राजकारणात

हत्तरकी गटाचे महत्व असाधारण आहे. ज्या गटाशी या गटाची युती होते तो गट जिंकतो किंवा ज्या गटाशी या गटाची फारकत होते तो गट पराभूत होतो, हे १९९५ च्या निवडणुकीने सिध्द झाले. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत गडहिंग्लज विधान सभा मतदार संघात राजकुमार हत्तरकी अपक्ष उमेदवार म्हणून उभे राहिले. आणि त्यांच्या उमेदवारीमुळे सलग दोनवेळा निवडून आलेल्या श्रीपतराव शिंदे यांचा पराभव झाला. विरोधी पक्षाच्या राजकीय पुढाऱ्याला यश मिळविण्यासाठी आणि ते कायम टिकविण्यासाठी कॉंग्रेस अंतर्गत एखाद्या गटाचा पाठिंबा घ्यावाच लागतो. हे यावरून सिध्द होते.

## गडहिंग्लजचे पक्षीय राजकारण आणि गटबाजी

गडहिंग्लज तालुक्यातील राजकारणात सुरवातीला रत्नाप्पा कुंभार गट विरुध्द म.दुं. श्रेष्ठी गट अशी गटबाजी होती. ग्रामपंचायती, सोसायटी, दूध संस्था, पंचायत समिती, मार्केट कमिटी, जिल्हा बँक, कृषी व ग्रामीण विकास बँक अशा मातब्बर संस्थांवर रत्नाप्पा कुंभार गटाचे वर्चस्व होते. परंतु डॉ. शिवलिंग घाळी हे खासदार उदयसिंगराव गायकवाड यांचे समर्थक ठरल्याने रत्नाप्पा कुंभार गटाला शह बसला. यातूनच नागाप्पाण्णा बटकडली हे अपयशी राजकारणी ठरले आणि तालुका राजकारणात म.दुं. श्रेष्ठी गटाचे अस्तित्व संपुष्टात आले. बदलत्या राजकीय घडमोडीत कॉंग्रेस पक्षांतर्गत दुहीचा लाभ घेऊन जनता दलाला मिळालेल्या संधीचा श्रीपतराव शिंदे यांनी फायदा उठविला. एकदाच नव्हे तर दोनवेळा आमदार होण्याची संधी श्रीपतराव शिंदे यांना मिळाली. १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत पूर्वाश्रमीचे समाजवादी कॉंग्रेसचे नेते बाबासाहेब कुपेकर यांनी पुलोद आघाडी-मार्फत श्रीपतराव शिंदे यांना विजयी करण्यात साथ दिली. कॉंग्रेस अंतर्गत

गटबाजीचा फायदा घेऊन १९८५ च्या नगरपालिका निवडणुकीत जनता पक्षाला सत्ता मिळाली. तसेच साखर कारखान्याचे अध्यक्षपद मिळविण्यातही श्रीपतराव शिंदे यशस्वी ठरले. तसेच सन १९९० च्या विधान सभा निवडणुकीतही काँग्रेस (आय) चे राजकुमार हत्तरकी यांनी काँग्रेस उमेदवाराचा पराभव करण्यासाठी जनता दलाचे उमेदवार श्रीपतराव शिंदे यांना पाठिंबा दिला आणि श्रीपतराव शिंदे सलग दुसऱ्यावेळी विजयी झाले. आमदार श्रीपतराव शिंदे यांनी काँग्रेस अंतर्गत दुफळीचा वेळोवेळी लाभ उठविल्याचे दिसून येते.

गडहिंग्लज तालुक्यातील काँग्रेस पक्षांतर्गत राजकारणाचा विचार केला तर स्वातंत्र्योत्तर काळात सुरवातीला रत्नाप्पा कुंभार गट विरूद्ध म.दु. श्रेष्ठी गट आढळतो. नंतरच्या काळात डॉ. शिवलिंग घाळी विरोधी नागाप्पाण्णा बटकडली गट दिसतो. सध्या गडहिंग्लज तालुका काँग्रेस पक्षांतर्गत बाबासाहेब कुपेकर यांच्या विरूद्ध राजकुमार हत्तरकी गट आहे. गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाच्या इतिहासात काँग्रेस पक्षाची ताकद ही कायम दोन गटात विभागलेली आहे. या दोन गटात नेहमी सत्तेसाठी व खुर्चीसाठी चुरस दिसते. या चुरशीतून पुढे ऐकमेकांचे पाय ओढण्याचे आणि पाडापाडीचे राजकारण सुरु झाले. गडहिंग्लज तालुका हा गटबाजीने पोखरलेला आहे. विविध गटाकडून केवळ सत्तेचे व खुर्चीचे राजकारण केले जात आहे. केवळ तालुक्यातील नेत्यांच्या अंतर्गत भांडणामुळे जिल्हा पातळीवरील कोणतेही महत्वाचे पद गडहिंग्लज तालुक्याला मिळालेले नाही. गडहिंग्लज तालुक्याच्या पक्षीय राजकारणात गटबाजीने उच्छाद मांडलेला दिसतो.

## श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाची वैशिष्टये

महाराष्ट्रात आज स्थानिक नेतृत्व हे सहसा तीन प्रकारातून उदयास येते असे दिसते. १) सहकारी संस्थांच्या माध्यमातून, २) पंचायत राज्य-

संस्था मधून, ३) नगरपालिकेचे राजकारण व राजकीय चळवळी यातून सहकारी साखर कारखाना आपल्या ताब्यात घेणे व त्या माध्यमातून अनेक सहकारी संस्था ताब्यात घेऊन नवीन नेतृत्व उदयास येत असतात. याचे उत्तम उदाहरण म्हणून वाळव्याचे आमदार श्री. जयंत पाटील तसेच खानापूर-आटपाडीचे आमदार राजेंद्र देशमुख यांचे घेता येईल. पंचायती राज्य संस्थामधून पंचायत समितीवर आपले प्रभुत्व निर्माण करणे व त्याच्या माध्यमातून तालुक्यातील ग्रामपंचायतीवर आपले वर्चस्व प्रस्थापित करणे याचे उत्तम उदाहरण म्हणून कवठेमहांकाळचे आमदार अजितराव घोरपडे यांचे घेता येईल. त्यांनी प्रथम पंचायत समितीमध्ये आपला प्रभाव निर्माण केला. आज ते आमदार म्हणून विधानसभेत प्रतिनिधित्व करीत आहेत. विधानसभेतून निवडून येणे या संदर्भातील उदाहरणे अपवादात्मक अशी क्वचित पाहावयास मिळतात. म्हणजे एकदम विधान सभा निवडणुकी-साठी उभे राहाणे व आपले नेतृत्व उभे करून निवडून येणे.

वरील तिन्ही प्रकारचा विचार केला असता ॲड. श्रीपतराव शिंदे यांचे नेतृत्व हे तिसऱ्या प्रकारातून उदयास आल्याचे दिसते. साखर कारखाना किंवा पंचायत समिती या दोन्ही माध्यमातून त्यांचे नेतृत्व उभे राहिलेले नाही. शिंदे यांचे नेतृत्व संस्थात्मक सत्तेच्या राजकारणातून निर्माण झाले नाही तर ते त्यांनी केलेल्या सामाजिक आणि राजकीय चळवळीतून निर्माण झाले. ते विधानसभेला जनता पक्षातून उभे राहिले आणि निवडून आले. आमदार झाल्यानंतर त्यांनी आपले नेतृत्व या मतदारसंघात रुजविण्यासाठी अनेक विविध विकास कामांना गती दिली आणि आपले नेतृत्व लोकांत पक्के करीत त्यांनी सन १९९० ची विधानसभा निवडणुकही पुन्हा दुसऱ्या वेळी जिंकली. श्रीपतराव शिंदे यांनी जयंत पाटील, राजेंद्र देशमुख, अजितराव घोरपडे यांच्यासारखी तळातून नेतृत्वाची उभारणी केली

नाही तर आमदार झाल्यानंतर स्वत:चे नेतृत्व पध्दतीशीरपणे उभे केले. प्रथम नगरपालिका, त्यानंतर सहकारी साखर कारखाना आणि पंचायत समितीवरही त्यांनी प्रभाव निर्माण केला. गडहिंग्लज तालुक्यातील नेतृत्वाची पोकळी आणि विकास कामांची योजना आखीत आपल्या आमदारकीचा मोठया कुशलतेने आणि दूरदृष्टीने वापर करीत श्री. श्रीपतराव शिंदे यांनी तालुका राजकारणात आपले स्थान पक्के केले. अनेक विकास कामे करुन लोकांच्या मनात स्वत:ची चांगली प्रतिमा उभी केली. कॉंग्रेस अंतर्गत पक्षीय राजकारणाचा किंवा गटबाजीचाही त्यांनी आपले राजकारणात पाय घट्ट रोवण्यासाठी उपयोग केला. वरील सर्वदृष्टीने विचार करता श्रीपतराव शिंदे यांनी स्वकर्तृत्वावर आपली एक विशिष्ट प्रतिमा उभी केली हे मात्र निश्चित आहे. त्यांच्या नेतृत्व विकासाला कोणत्याही मोठया पुढा-याचा वरदहस्त नव्हता.

## गडहिंग्लज पंचायत समिती आणि स्थानिक राजकारण

महाराष्ट्रामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे आणि ग्रामीण भागाचा विकास व्हावा या हेतूने १९६२ पासून पंचायत राज्यसंस्था उदयास आली. पंचायत राज्य महाराष्ट्रात स्थापन करण्यात यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा होता. गडहिंग्लज तालुक्यातील पंचायतीच्याराजकारणाचे स्वरुप पाहिले असता असे लक्षात येते की, गडहिंग्लज पंचायत समितीवर १९६२ पासून कॉंग्रेस पक्षाचीच सत्ता आहे. श्रीपतराव शिंदे यांना आपले नेतृत्व प्रभावी करण्यासाठी पंचायत समितीचा फारसा उपयोग झालेला नाही. पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेवर कॉंग्रेस अंतर्गत गटाचा प्रभाव असल्यामुळे आपल्या नेतृत्वाची घडी पक्की करण्यासाठी श्रीपतराव शिंदे यांना नगरपालिकेवर आणि साखर कारखान्यावर आपले लक्ष केंद्रीत करावे लागले. १९८५ साली त्यांनी जनता पक्षांतर्गत जनता आघाडी स्थापन करुन

या आघाडीमार्फत निवडणूक जिंकून नगरपालिका आपल्या वर्चस्वाखाली आणली व नगरपालिकेच्या माध्यमातून शहर विकासासाठी विविध योजना अंमलात आणल्या. गडहिंग्लज साखर कारखान्यावर सुरवातीपासून ते १९८८ पर्यंत संस्थापक चेअरमन श्री. आप्पासाहेब नलवडे यांचे एकमुखी नेतृत्व होते. परंतु १९८८ मध्ये काँग्रेसमधील काही गट आणि श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील जनता दल यांनी शेतकरी पॅनलची स्थापना केली आणि कारखान्यात सत्तांतर घडविले. ऑक्टोबर, १९९० मध्ये श्रीपतराव शिंदे कारखान्याचे चेअरमन झाले. कारखान्याच्या माध्यमातून तालुक्याच्या विकासासाठी विविध कामे केली.

गडहिंग्लज तालुका पंचायत समितीच्या राजकारणावर तालुक्याच्या आणि साखर कारखान्याच्या राजकारणाचा मोठाच प्रभाव पडलेला आपल्याला दिसून येतो. कारण पंचायत समिती हा सुध्दा स्थानिक राजकारणाचा एक आखाडा आहे. सुरवातीच्या काळामध्ये पंचायत समितीमध्ये जास्त गटबाजीच्या राजकारणाचा प्रभाव नव्हता, परंतु नंतरच्या काळामध्ये त्यातही गटबाजीचे राजकारण मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाले. १९८० नंतर तालुक्यामध्ये अनेक गट निर्माण झाले. पण काँग्रेस पक्षांतर्गत राजकुमार हत्तरकी यांचा गट पंचायत समिती राजकारणामध्ये जास्त प्रभावी दिसतो. किंबहुना आपणास असेही म्हणता येईल की, हत्तरकी यांच्या राजकीय जीवनाची जडणघडणच पंचायत समिती राजकारणात झाली. पंचायत समिती राजकारणामध्ये कायमस्वरूपी प्रस्थापित केले आहे.

हत्तरकी यांचा प्रभाव हलकर्णी भागात जास्त असून पंचायत राज्य संस्थांचा वापर त्यांनी विकासकामासाठी केला. राजकुमार हत्तरकी हे स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या लोकांत खंबीर आधार असणाऱ्या

नेत्याचे एक आदर्श उदाहरण आहे. कारण सत्तेच्या राजकारणात त्यांनी आपल्या गटाचा पासंगासारखा वापर करून सत्तेच्या समीकरणात बदल घडवून आणला. पक्षापेक्षा गटाला व गटाच्या राजकारणाला अग्रक्रम देवून त्यांनी राजकारण केलेले आपणास दिसते. गटबाजीचे राजकारण जातिविरहित असते.

स्थानिक राजकारण गटबाजी आणि राजकारण विकास

पंचायत राज्याच्या प्रयोगापासून स्थानिक पातळीवरील लोकांचा राजकारणातील सहभाग वाढला. परंतु त्यातही सत्ता टिकविण्यासाठी गट आणि सत्ता राजकारण सुरु झाले. गटागटामध्ये स्पर्धा सुरु झाल्या. या गटांच्या परस्पर संबंधामुळे प्रत्येक गट स्वत:चा प्रभाव टिकविण्यासाठी काही कार्य करु लागले. विविध योजना, प्रकल्प यांचा पाठपुरावा करून जनतेवरची आपली पकड कायम ठेवून राजकारणातील स्थान टिकवू लागले. हाती असलेल्या सत्तेचा वापर गट राजकारणात काही ठराविक व्यक्तींना होत असला तरीही गटांच्या परस्पर स्पर्धेमुळे लोकांसाठी काही कामे करणे गटांना अपरिहार्य ठरले. गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात असे दिसते की, कुपेकर गट, हत्तरकी गट, नलवडे गट, हे कॉंग्रेस पक्षांतर्गत विविध गट हे पंचायती राज्याच्या विविध संस्थांवर व सहकारी संस्थांवर आपली पकड निर्माण करण्यासाठी कार्यरत असलेली दिसतात. लोकशाहीतील पंचायती राज्य हा सत्ता विकेंद्रीकरणाचा प्रयोग बराचसा यशस्वी झालेला दिसतो. यामधूनच नव्याने स्थानिक नेतृत्व निर्माण होऊ लागले. परंतु यातून निर्माण झालेले नवे नेतृत्व सत्तेच्या राजकारणात गुरफटून राहिले आहे. सत्तास्थाने काबीज करणे आणि राजकारणातील आपला प्रभाव वाढविणे यावरच विशेष भर दिला जात आहे. सत्ताप्राप्ती हे लोकसेवेचे साधन न मानता ते प्रतिष्ठेचे लक्षण मानण्याची प्रवृत्ती वाढत आहे. पंचायत राज्यात निर्माण

झालेले गटबाजीचे व जातीवादाचे राजकारण, सत्तासंघर्ष आणि त्यातून गटबाजी यामुळे विकासाला खीळ बसते. गटबाजीमुळे राजकीय विकास होत नाही. गटराजकारणामुळे एखाद्या गटाचा फायदा होतो. परंतु त्यामुळे इतर गटांची हानी होते. गटराजकारणामुळे समाजाचा विकास होत नाही. गटबाजीमुळे राजकारण विकसित होण्याऐवजी दूषित बनते.

प्रा. बी.एस. बावीसकर यांच्या मते, गटबाजीमुळे विकासाचे राजकारण सुरू होते. यातून नव्या ग्रामीण नेतृत्वाचा उदय होतो. लोकांचा राजकीय सहभाग वाढतो. सत्ताधारी पक्षाचे संघटन यातून साधते. स्पर्धात्मक लोकशाहीचे वातावरण तयार होते. राजकीय कार्यकर्त्यांची भरती करता येते. हितसंबंधी गटांच्या कार्याला चालना मिळते. गटबाजी, सत्तास्पर्धेमुळे विविध लोकोपयोगी विकास कामे केली जातात. पण हे बरोबर नाही.

स्थानिक राजकारण, जिल्हा राजकारण, राज्य व केंद्रीय स्तरावरील राजकारण यांचे परस्परांशी जवळचे संबंध आहेत. सत्तास्थाने मिळविणे, आपला राजकारणातील प्रभाव वाढविणे, ग्रामपातळीवरून पंचायत पातळी गाठणे त्यानंतर जिल्हा पातळीवर नेतृत्व उभे करणे व हळू हळू राज्यपातळी व राष्ट्रपातळीचा विचार करणे अशी प्रक्रिया वाढीस लागलेली दिसते. हळूहळू अप्रत्यक्षपणे पक्षीय राजकारणाचा प्रभाव या पातळ्यांवर वाढीस लागतो. त्यामुळे राज्य व स्थानिक राजकारण यांच्यात सत्ता संबंध असणे अपरिहार्य असते. राज्य स्तरावरचे नेतृत्वाचे स्वरूप जसे असते, त्याप्रमाणात स्थानिक नेतृत्वाच्या गटाला कमी अधिक महत्व प्राप्त होते. स्थानिक पातळीवरचे पुढारी राज्य किंवा केंद्र स्तरावरील पुढाऱ्यांच्या आदेशानुसार किंवा मतानुसार काम करतात. गटराजकारणामुळे काही विकास कामे होत असली तरी परस्पर हेवेदावे सत्तासंघर्ष गटबाजी वाढीस लागते. विकास कामांना खीळ

बसते. ख-या अर्थाने सर्वांगिण विकास साधावयाचा असेल तर गटबाजी, पक्षीय राजकारण संपुष्टात आणले पाहिजे. तरच विकास कामांना गती मिळेल.

<u>स्थानिक राजकारण - जात आणि वर्ग</u>

गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाचा जातीयदृष्टया विचार केला तर तालुका राजकारणावर जातीयतेचे प्राबल्य दिसते. पक्षीय स्वार्थासाठी जात व जातीय गट यांचा सर्रास वापर होताना दिसतो. समाजकारणापासून राजकारणापर्यंत सर्व क्षेत्रात जातीयवाद प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या आढळतो. राजकारणाच्या क्षेत्रात जातीयवादाने आपली पकड घट्ट केलेली आहे. ग्रामपंचायतीपासून ते इतर सहकारी संस्था, तालुका राजकारणात सामान्य नागरिकांच्या मनातील जातीय भावनेला आवाहन केले जाते. सत्ताकेंद्रात शिरकाव करण्यासाठी लहान-मोठया सर्व जाती जमातीचे नेते आपल्या जातीबांधवाना संघटित करण्याचा प्रयत्न करतात. राजकीय पक्षातील गटबाजीही प्रामुख्याने जातीय राजकारणावर आधारीत असल्याचे दिसते. गडहिंग्लज तालुक्यातील राजकारणावर मराठा आणि लिंगायत समाजातील अभिजन वर्गाचे प्राबल्य असल्याचे दिसते. इतर काही जाती तालुक्यात आढळतात. पण त्या जातीतील पुढा-यांचा राजकारणावर फारसा प्रभाव नाही. त्यामुळे जातीयदृष्टया मराठी-लिंगायत जातीतील पुढा-यांनी गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणावर पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. परंतु या जातीतील प्रस्थापित पुढारी सर्व जाती जमातींना अनुसरुन कार्य करताना दिसतात. गडहिंग्लजच्या राजकारणावर जातींवर आधारलेला जातीयवाद नाही. तालुका राजकारणात काही जातीचे प्राबल्य असले तरी सर्व जातींचा आधार घेऊन सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे विशिष्ट जातीचा आधार घेवून निवडणूक जिंकली असे म्हणता येत नाही.

गडहिंग्लज तालुक्यातील राजकारणाचा विचार करीत असताना त्या राजकारणाला राजकीय संस्थांची पार्श्वभूमी असलेली दिसते. या संस्थांच्या माध्यमातून सत्ताकेंद्रे प्रस्थापित केली जातात. ही सत्ताकेंद्रे मिळविण्यासाठी सत्तास्पर्धा, गटबाजी, पक्षीय राजकारण सतत चालू असते. गडहिंग्लज तालुक्यातील जमीनदार, बागायतदार, आर्थिकदृष्टया सधन वर्गाचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. गडहिंग्लज हे व्यापारी पेठ म्हणूनसुध्दा प्रसिध्द आहे. गडहिंग्लजमधील व्यापारी पेठेवर लिंगायत समाजाचे वर्चस्व आढळते. तालुका राजकारणावर व्यापारी वर्गाचाही प्रभाव आढळतो.

बागायतदार जमीनदार व्यापारी यांचे वर्चस्व तालुक्याच्या राजकारणावर आहे. त्याचप्रमाणे पांढरपेशे मध्यमवर्गीय व व्यावसायिक व वर्गातील नेतेही पुढे आलेले आहेत. याळी, बागी आणि हत्तरकी हे पुढारी लिंगायत समाजातील श्रीपतराव शिंदे, नलवडे, कुपेकर आणि माधुरी देवी देसाई, प्रा. कुराडे हे मराठा समाजातील पुढारी आहेत. शहापूरकर बंधू ब्राम्हण समाजातील तर प्रा. बन्ने, करिगार हे धनगर समाजातील आहेत.

वर्गीय आणि जातीय वादावर राजकारणाचे संघटन होत असले तरी गटबाजीचे राजकारण जाती व वर्गाच्या पायावर खेळले जात नाही.

.....

## प्रकरण सातवे

# उ प सं हा र

## प्रकरण सातवे

## उ प सं हा र

प्रस्तुत शोधनिबंधात गडहिंग्लज तालुक्यातील पक्षीय राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्याला अनुसरून ॲड. श्रीपतराव शिंदे यांचा राजकारणामध्ये उदय कसा झाला आणि गडहिंग्लज तालुक्यामध्ये त्यांनी आपले नेतृत्व कसे प्रस्थापित केले याचा अभ्यास करण्यात आला आहे. गडहिंग्लज तालुका हा नव्याने चेहरा मागणारा तालुका आहे. त्यामुळे वारंवार विरोधी पक्षांना संधी मिळत गेली. १९७२ पासून १९८५ पर्यंत गडहिंग्लज तालुक्यात काँग्रेस पक्षाचाच प्रभाव होता. तत्पूर्वी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात मात्र महाराष्ट्राप्रमाणेच गडहिंग्लजमध्येही काँग्रेस पक्षाचा पराभव झाला व काँग्रेस पक्षाचा प्रभाव कमी झाला. १९५७ विधानसभा निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे डो.एस्. नार्वेकर विजयी झाले. १९५७ ते १९६७ पर्यंतचा गडहिंग्लज तालुक्याचा इतिहास पाहिला असता आपणास असे दिसते, या तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाव्यतिरिक्त इतर कोणताही पक्ष प्रभावी नव्हता. काँग्रेसला तुल्यबल असा शेकापक्षच होता. १९६७ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाने भरघोस यश मिळविले. परंतु गडहिंग्लज तालुक्यात मात्र शेतकरी कामगार पक्षाचे भाई तुकाराम कोलेकर विजयी झाले. त्यानंतरच्या काळात मात्र तालुका राजकारणात शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव कमी झाला. महाराष्ट्रात १९६२ पासून पंचायत राज्य प्रयोगातून स्थानिक पातळीवरील राजकारणात बदल होत गेले. ग्रामपंचायती, पंचायती समिती, जिल्हा परिषद, सहकारी संस्था, मार्केट कमिटी, नगरपालिका इत्यादी सत्ताकेंद्रे निर्माण झाली. त्यातून ही सत्ताकेंद्रे ताब्यात घेण्यासाठी वेगवेगळे गट निर्माण झाले. स्थानिक पुढाऱ्यांना सत्ता

राजकारणात महत्व प्राप्त झाले. यातून तालुक्याच्या विकासाचा प्रश्न महत्वाचा होता. ते प्रश्न हातात घेऊन ॲड. श्रीपतराव शिंदे यांनी प्रयत्न सुरु केले. त्यातून त्यांचा विधानसभा निवडणुकीत १९८५ मध्ये विजय झाला. गडहिंग्लज तालुक्यात आपले नेतृत्व स्थिरविण्यासाठी त्यांनी विविध विकासात्मक कामे हाती घेऊन गडहिंग्लज तालुक्यातील काँग्रेस पक्षांतर्गत अनेक गट निर्माण झाले. काँग्रेस पक्षातील गटबाजीचा श्रीपतराव शिंदे यांनी तालुका राजकारणात वेळोवेळी लाभ उठवीत आपले पाय घट्ट रोवले. त्यामुळे तालुका राजकारणात श्रीपतराव शिंदे यांचा उदय आणि काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजीच्या राजकारणाचा टीकात्मक अभ्यास या शोधनिबंधात करण्यात आला आहे.

## सारांश

प्रस्तुत प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात गडहिंग्लज तालुक्यातील सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या तालुक्याला म.दु. श्रेष्ठी, बंडाप्पाण्णा घुगरे, शंकरराव कोरी, मल्लाप्पा धूप, गोपाळ सुतार आणि काळू मास्तर यांचे नेतृत्व लाभले. गडहिंग्लज तालुक्याचा महत्वाचा भाग कोल्हापूर संस्थानात समाविष्ट होता. काही भागात प्रजा परिषद चळवळही प्रबळ होती. गडहिंग्लज शहर हे व्यापारी पेठ म्हणून प्रसिध्द आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्याशी गडहिंग्लजचे व्यापारी संबंध आहेत. गडहिंग्लज भागाला छत्रपती शिवाजी महाराजाच्या काळापासून ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. गडहिंग्लज शहराजवळच सामानगड हा ऐतिहासिक किल्ला वसलेला आहे. गडहिंग्लज भागात शेती ही संपन्न आहे. काही शेतकरी सधन आहेत. सामाजिक दृष्ट्या गडहिंग्लज भागात तीन जाती महत्वपूर्ण आहेत. मराठा, लिंगायत व धनगर या जातींना तालुका राजकारणात महत्वाचे स्थान आहे. तालुका

राजकारणात इतर समाजही महत्वपूर्ण भूमिका पार पाडीत असतो. लिंगायत आणि मराठा समाजातील अभिजनांचे वर्चस्व राजकारणात आहे. या दोन्ही जातीत अनेक लोक आर्थिक दृष्टया सधन आहेत. त्यांच्याकडे मुबलक जमीन आहे. गडहिंग्लज तालुका सामाजिक आणि राजकीय चळवळी-साठी प्रसिध्द आहे. तसेच सहकारी चळवळही या तालुक्यात विकसित आहे. दलित, भटके, माकडवाले, फासेपारधी, आणि बेरड इत्यादी समाजाच्या प्रश्नासाठी आंदोलने सुरु झाली. या तालुक्यात १९७५ साली देशातील पहिली देवदासी परिषद भरविण्यात आली. कारण या भागात अनेक देवदासी आहेत. अशाप्रकारे पहिल्या प्रकरणात विविध सामाजिक बदलांचा आणि चळवळींचा आढावा घेण्यात आला आहे.

दुस-या प्रकरणामध्ये १९५२ ते १९८५ या दरम्यानच्या काळात घडलेल्या राजकीय घटनांच्या आधारे येथील पक्षीय राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. गडहिंग्लज तालुक्याचा शैक्षणिक विकास, आर्थिक स्थिती, जातीव्यवस्था, सहकारी चळवळीची वाटचाल, स्थानिक राजकारण यांचाही आढावा घेण्यात आला आहे. १९५२ साली म.दुं. श्रेष्ठी यांनी गडहिंग्लज विधानसभा निवडणूक जिंकली. नंतरच्या काळात संयुक्त महाराष्ट्र चळवळीने महाराष्ट्रात प्रभाव निर्माण केला. म्हणून १९५७ साली गडहिंग्लज विधान सभा मतदार संघातून शेकापचे श्री. डी.एस्.नार्वेकर विजयी झाले. १९६२ साली कॉंग्रेसचे आप्पासाहेब नलवडे यांनी विजय नोंदविला. बेळगाव आणि कर्नाटक, महाराष्ट्र सीमाप्रश्नाबाबतच्या आंदोलनाने या भागात चांगलाच जोर धरला. त्यामुळे १९६७ साली शेकापचे भाई तुकाराम कोलेकर हे विजयी झाले. या निवडणुकीनंतर या भागात शेकापचा प्रभाव कमी झाला. १९७२ साली कॉंग्रेसचे बी.एस्. पाटील विजयी झाले. १९७२ नंतर राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील राजकारणात अनेक महत्वपूर्ण बदल झाले.

यशवंतराव चव्हाणांचे राजकीय प्रतिस्पर्धी शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. १९७५ साली देशात आणिबाणी पुकारण्यात आली. १९७७ साली झालेल्या अभूतपूर्व लोकसभा निवडणूकीत काँग्रेसचा पराभव होऊन मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाचे सरकार सत्तारूढ झाले. महाराष्ट्रात काँग्रेसची दोन गटात विभागणी झाली. इंदिरा काँग्रेस आणि स्वर्णसिंग काँग्रेस असे दोन गट काँग्रेसमध्ये पडले. स्वर्णसिंग काँग्रेसचे वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. यावेळी दक्षिण महाराष्ट्रात काँग्रेस (आय) ला विशेष पाठिंबा नव्हता. परंतु डॉ. एस.एस. घाळी, बाबासाहेब कुंजीरे, दिग्विजय खानविलकर यांनी काँग्रेस (आय) ला पाठिंबा दिला. १९७८ च्या निवडणुकीत दक्षिण महाराष्ट्रात काँग्रेस (आय) चे डॉ. शिवलिंग घाळी हे एकमेव उमेदवार विजयी झाले. या निवडणुकीत त्यांनी जनता पक्षाचे श्रीपतराव शिंदे आणिकाँग्रेस (एस) चे नागाप्पाण्णा बटकडली यांचा पराभव केला. डॉ. घाळी हे तब्बल २२ वर्षे गडहिंग्लजचे नगराध्यक्ष होते. त्यामुळे तालुका राजकारणात आणि गडहिंग्लज शहरावर त्यांचा प्रभाव होता. त्याचाही फायदा त्यांना झाला. १९८० च्या मुदतपूर्व विधानसभा निवडणुकीत डॉ. घाळी सलग दुसऱ्यांदा विजयी झाले. यावेळी त्यांनी जनता पक्षाचे श्रीपतराव शिंदे आणि समाजवादी काँग्रेसचे बाबा कुपेकर यांचा पराभव केला. १९७८ ते १९८५ या काळात डॉ. घाळींचे तालुका राजकारणात वर्चस्व होते. या काळात अनेक नेते तालुका राजकारणात उदयास आले. पंचायत समितीतून राजकुमार हत्तरकी, साखर कारखान्या-मधून आप्पासाहेब नलवडे आणि प्रा. कुराडे, विलासराव बागी अशा नेत्यांचा उदय झाला.

प्रकरण तीन मध्ये गडहिंग्लज नगरपालिकेच्या राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. नगरपालिका स्थानिक राजकारणात महत्वाची भूमिका बजावते. गडहिंग्लज नगरपालिकेला फार मोठी ऐतिहासिक परंपरा

लाभलेली आहे. १९८७ साली या नगरपालिकेची स्थापना झाली. स्वातंत्र्यानंतर डॉ. ए.बी. गुणे, शंकरराव हिडदुगी, मोळदी यांचे नगरपालिकेला नेतृत्व लाभले. १९६० साली डॉ. घाळी नगराध्यक्ष झाले. तेव्हापासून १९८१ पर्यंत त्यांनी हे पद भूषविले. आपल्या नगराध्यक्ष कार-किर्दीत डॉ. घाळींनी अनेक विकास कामे केली. त्याचा फायदा त्यांना १९७८ व १९८० च्या विधानसभा निवडणुकीत झाला. १९७४ साली जनता आघाडीने गडहिंग्लज नगरपालिकेत बहुमत मिळविले. परंतु यावेळी डॉ.घाळी मात्र नगराध्यक्ष म्हणून प्रत्यक्ष मतदारांकडून निवडले गेले. त्यांची पालिकेत बहुमत नसतानाही नगराध्यक्षपदी निवड झाली. १९८५ साली जनता आघाडीला नगरपालिकेत बहुमत मिळाले. तेव्हापासून नगरपालिका राज-कारणात श्रीपतराव शिंदे यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. १९९१ साली झालेल्या निवडणुकीत राजर्षी शाहू नगरविकास आघाडी ही कॉंग्रेसप्रणित आघाडी विजयी झाली. जनता आघाडीचा या निवडणुकीत पराभव झाला. नगरपालिका राजकारणात स्थानिक आणि गटराजकारणाला महत्त्व असते.

प्रकरण चारमध्ये गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याच्या राज-कारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. गडहिंग्लज तालुक्याच्या विकासा-साठी १९७६ साली गडहिंग्लज साखर कारखान्याची स्थापना झाली. ॲड. आप्पासाहेब नलवडे हे पहिले चेअरमन बनले. १९८८ पर्यंत त्यांचेच कारखाना राजकारणात वर्चस्व होते. १९८८ साली झालेल्या साखर कारखाना निवडणुकीत जनता दलाचे श्रीपतराव शिंदे, समाजवादी कॉंग्रेसचे बाबा कुपेकर यांनी शेतकरी आघाडीची स्थापना केली. या निवडणुकीत शेतकरी पॅनेलचा विजय झाला. कॉंग्रेसचे शरदचंद्र शहापूरकर साखर कारखान्याचे अध्यक्ष झाले. परंतु त्यांचे अल्पकाळातच निधन झाले. त्यानंतर जनता दलाचे श्रीपतराव शिंदे साखर कारखाना अध्यक्ष बनले.

त्यांनी विविध विकास कामे या माध्यमातून केली. १९९३ च्या साखर कारखाना निवडणुकीत बाबा कुपेकर यांनी अप्पासाहेब नलवडे गटाशी हातमिळवणी केली आणि राजर्षि शाहू आघाडीची स्थापना केली. श्रीपतराव शिंदे यांचे शेतकरी पॅनेल आणि राजकुमार हत्तरकी यांचे सहकार पॅनेल यांचा पराभव झाला आणि कुपेकर-नलवडे प्रणित शाहू आघाडी विजयी झाली. या निवडणुकीनंतरच्या काळात श्रीपतराव शिंदे यांच्या राजकीय वर्चस्वाला हळूहळू शह बसला.

प्रकरण पाचमध्ये गडहिंग्लज तालुका पंचायत समिती राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाचा स्वीकार करण्यासाठी बळवंतराय मेहता समितीने त्रिसूत्री योजनेची शिफारस केली. महाराष्ट्रात वसंतराव नाईक समिती नेमण्यात आली. वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीवरून पंचायत राज्याचा स्वीकार करण्यात आला. महाराष्ट्रात १९६२ पासून पंचायत राज्य प्रक्रिया सुरू झाली. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत यांना या पंचायत राज्य व्यवस्थेत महत्वाचे स्थान आहे. १९६२ पासून गडहिंग्लज पंचायत समितीवर कॉंग्रेस पक्षाचेच वर्चस्व आहे. १९७९ च्या निवडणुकीत शेकापचा फक्त एक उमेदवार विजयी झाला होता. १९९२ च्या निवडणुकीत जनता दलाला फक्त दोन जागा मिळाल्या. श्रीपतराव शिंदे यांना पंचायत समिती राजकारणात वर्चस्व प्रस्थापित करण्यात अपयश आल्याचे आढळते. १९७२ नंतरच्या काळात राजकुमार हत्तरकी यांचे पंचायत समिती राजकारणात वर्चस्व वाढत गेले. १९९२ च्या निवडणुकीतही हत्तरकी गटाचा विजय झाला. व त्यांच्या उमेदवार माधुरीदेवी देसाई-महागावकर या पंचायत समितीच्या सभापती बनल्या.

प्रकरण सहामध्ये गडहिंग्लज तालुक्यातील राजकारणाचा टीकात्मक अभ्यास करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणाचे मुख्य

तीन आखाडे आहेत. १) पंचायत राज्य, २) सहकारी चळवळीतील राजकारण, ३) नगरपालिका राजकारण. या तीनही घटकांचा परस्परांशी जवळचा संबंध असतो. या तीनही आखाडयात यश मिळविण्यासाठी विविध राजकीय पक्ष, गट प्रयत्न करीत असतात.

डॉ. घाळी यांचा उदय नगरपालिका राजकारणातून सहकारी साखर कारखान्यातून आप्पासाहेब नलवडे यांचा, पंचायत समितीतून राजकुमार हत्तरकी यांचा व जिल्हा परिषदातून बाबा कुपेकर यांचा उदय झालेला आहे. श्रीपतराव शिंदे यांचा उदय विविध सामाजिक व राजकीय चळवळीतून झालेला आहे. १९८५ साली शिंदे यांनी विधानसभा निवडणूक जिंकली आणि नंतरच्या काळात नगरपालिका व साखर कारखाना यावर सत्ता प्रस्थापित केली.

काही महत्वाचे निष्कर्ष

गडहिंग्लज तालुक्यातील स्थानिक राजकारण गुंतागुंतीचे आहे. विविध संस्था, गट, राजकीय पक्ष यामध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पाडीत असतात. सातारा आणि फलटण तालुक्याच्या राजकारणाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसते की, चिमणराव कदम यांचा उदय फलटण तालुक्यात कॉंग्रेस अंतर्गत विकसीत होऊनही ते नेतृत्व कायमस्वरुपी टिकले नाही. तसेच सातारा तालुक्यातून अभयसिंह राजे भोसले यांचा उदय जनता पक्षातून झाला असला तरी तालुका राजकारणात वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी नंतर कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आणि तालुका राजकारणात आपले स्थान बळकट केले.[१] परंतु गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाचे खास वैशिष्टय म्हणजे

संदर्भ- १) फलटण तालुक्यातील पक्षीय राजकारण - जयश्री शेंडे
२) सातारा तालुक्यातील पक्षीय राजकारण - रविंद्र गायकवाड
एम्. फिल्. (राज्यशास्त्र) पदवी परीक्षेसाठी सादर केलेला शोधनिबंध.

आमदार श्रीपतराव शिंदे यांनी विविध सामाजिक - राजकीय चळवळीतून आपले नेतृत्व उभे केले आणि १९८५ ची विधानसभा निवडणूक जिंकली. नंतरच्या काळात गडहिंग्लज नगरपालिका व साखर कारखाना यावर सत्ता प्रस्थापित केले. राज्यात काँग्रेसची सत्ता असतानाही श्रीपतराव शिंदे यांनी विरोधी पक्षाचे आमदार म्हणून तालुका राजकारणात आपले स्थान बळकट केले.

गडहिंग्लज तालुक्यातील पक्षीय राजकारणाच्या अभ्यासाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) स्थानिक राजकारणात पक्षीय राजकारणाला दुय्यम स्थान असते. गटराजकारण यात महत्वाचे असते.

२) स्थानिक राजकारणाचे तीन महत्वपूर्ण आखाडे आहेत. 1) नगरपालिका 2) पंचायत संस्था 3) सहकारी संस्था. ज्या व्यक्तीची आमदार म्हणून निवड होते ती व्यक्ती आपल्या मतदार संघातील वर्चस्व वाढविण्यासाठी प्रयत्न करते. विविध संस्थेवर वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न करते. गडहिंग्लज तालुक्यात श्रीपतराव शिंदे यांनी १९८५ ते १९९५ या काळात तालुका राजकारणात वर्चस्व प्रस्थापित केल्याचे आढळते.

३) विरोधी पक्षाच्या नेत्याला पंचायत समिती राजकारणात वर्चस्व प्रस्थापित करणे सर्वसाधारणपणे कठीण असते. श्रीपतराव शिंदे यांनी नगरपालिका आणि साखर कारखाना यावर सत्ता प्रस्थापित केली. परंतु गडहिंग्लज पंचायत समितीवर वर्चस्व प्रस्थापित करण्यात ते अपयशी ठरले.

४) विविध गटाशी हातमिळवणी करून सत्ता प्रस्थापित करण्यावर विविध नेत्यांचे भवितव्य अवलंबून असते. श्रीपतराव शिंदे यांनी वेळोवेळी काँग्रेस अंतर्गत विविध गटाशी हातमिळवणी करून विधानसभा

निवडणूक जिंकली. काँग्रेस अंतर्गत गटांचा पाठिंबा मिळविण्यात ते अपयशी ठरल्याने १९९५ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला.

५) पक्षीय राजकारणात विचारसरणीला काही प्रमाणात महत्व असते. पण गटबाजीचे राजकारण हे फक्त सत्तेच्या प्राप्तीसाठी आणि देवाण-घेवाणीसाठीच चालविले जाते. त्यात विचारसरणीला बिलकूल संधी नसते. कुठल्याही प्रकारची विचारसरणी विचारात न घेता गटबाजीचे राजकारण कुशलतेने केले जाते.

६) स्थानिक राजकारणात आपला प्रभाव रुजविण्यासाठी राजकीय नेते विविध राजकीय कृती आचरणात आणून विकास कामे करीत असतात. गडहिंग्लज तालुक्यात सामाजिक आणि आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी, तसेच मतदारसंघात प्रभाव वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असतात.

७) राष्ट्रीय आणि राज्य राजकारणाचा स्थानिक राजकारणावर प्रभाव आढळतो. १९७८ साली डॉ. घाळी यांनी इंदिरा काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणूक जिंकली. इंदिरा गांधीच्या लोकप्रियतेचा त्यांना फायदा झाला. नागाप्पाण्णा बटकडली आणि आप्पासाहेब नलवडे हे वसंतदादा गटाशी संबंधित होते. बाबा कुपेकर हे शरद पवार गटाशी संबंधित होते. शरद पवार मुख्यमंत्री झाल्यानंतर बाबा कुपेकर यांचे तालुका राजकारणात महत्त्व वाढलेले दिसते.

८) स्थानिक राजकारणात जातीय आणि वर्गीय हितसंबंध महत्वाचे असतात. जातीच्या मदतीने लोकांचा पाठिंबा मिळविला जातो आणि वर्गाच्या मदतीने सत्तेचे राजकारण करीत असताना अभिजनांची आघाडी उभारण्यात येते. त्याआधारे सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो.

९) काँग्रेस अंतर्गत गटराजकारण हे जिल्हा पातळीवरील राजकारणाशी संबंधित असते. राजकीय सत्ता मिळविण्यासाठी आणि प्रभाव निर्माण

करण्यासाठी नवीन गटाची निर्मिती केली जाते आणि जुन्या गटाचा त्याग केला जातो. आपणाला पाठिंबा मिळविण्यासाठी जिल्हा पातळीवरील नेत्यांशी संधान बांधले जाते. उदा. रत्नाप्पा कुंभार, दत्ताजी कदम, उदयसिंगराव गायकवाड, बाळासाहेब माने, महादेवराव महाडीक यांच्या विविध गटाशी हातमिळवणी तालुका काँग्रेस नेत्यांनी केल्याचे आढळते.

१०) महाराष्ट्राच्या राजकारणात भाजप शिवसेना युतीचा राजकीय शक्ती म्हणून उदय झाला आहे. १९९० च्या निवडणुकीत भाजप शिवसेना युतीने ९५ जागा जिंकून विधान सभेत प्रभाव वाढविला. १९९५ साली महाराष्ट्रात भाजप-शिवसेना युतीच्या सरकारची स्थापना झाली. परंतु गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात भाजप-शिवसेना युती प्रभावी झालेली आढळत नाही. त्यामुळे या भागात युतीतील दोन्ही पक्ष कमजोर आहेत असे म्हणायला हरकत नाही. भाजप-शिवसेना युती सरकारला महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आपले पाय घट्ट रोवावयास आणखी बराच अवधी लागणार आहे.

......

## (अ) संदर्भ ग्रंथ


१) बडे, वी.एस. - भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था उद्गम आणि विकास, हिमालया पब्लिशिंग हाउस, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७८.

२) भोळे, भा.ल. - दुसरे स्वातंत्र्य, अमेय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९७७.

३) भोळे, भा.ल. - यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९८५.

४) भोळे भा.ल. - महाराष्ट्राचे सत्ताधारी नेतृत्व - पाव शतकाचा प्रवास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे सातव्या राज्यशास्त्र परिषदेमध्ये वाचलेला शोधनिबंध.

५) चव्हाण, य.ब. - सह्याद्रीचे वारे, मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या निवडक भाषणांचासंग्रह, प्रकाशक - संचालक, महाराष्ट्र सरकार, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९६२.

६) चुनखडे ना.ए. आणि पाटील, वि.भ. - ग्रामीण समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, १९९०.

७) चौसाळकर अशोक - उत्तरेकडील राज्यांच्या निवडणूका आणि भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, प्रकाशन वर्ष, १९९३.

८) गरुड शांताराम (संपा.) - कृषी औद्योगिक समाजाची २५ वर्षे,
समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी,
प्रकाशन वर्ष, सन १९८५.

९) गरुड शांताराम आणि चौसाळकर अशोक - १९९४-९५ मधील विधानसभांच्या निवडणुका आशय आणि आदेश, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, प्रकाशन वर्ष, सन १९९५.

१०) गोकाककर सुधाकर आणि चराटी शामराव(संपा.) - हिरण्यकाशीच्या काठी, गडहिंग्लज नगरपरिषद शताब्दी स्मृतिग्रंथ, प्रकाशन, जानेवारी, १९८९.

११) जाधव, एस्.एस्. - १९९० मधील विधानसभांच्या निवडणूका, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, प्रकाशन, ११ मे, १९९०.

१२) जुगळे वसंत आणि जुगळे योजना - उसाच्या किंमतीचा घोळ, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, नोव्हेंबर, १९९५.

१३) जैन, अशोक - महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शेठ पब्लिशर्स, मुंबई, प्रथमआवृत्ती, जून,१९९३,

१४) कामत, अ.रा. - स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक बदल, मागोवा प्रकाशन, पुणे, १९८२.

१५) क्लिुरकर रावसाहेब, (स्मरणिका संपादक) - देव माणूस, प्रकाशक - सचीव, विद्या प्रसारक मंडळ, गडहिंग्लज, सन १९८७.

१६) मगदूम, राम (संपा.) - आमदार श्रीपतराव शिंदे गौरव अंक, प्रकाशन वर्ष, सन १९९३.

१७) माने, डी.ए. - शिल्पकार यशवंतराव चव्हाण, नयन प्रकाशन, विसापूर, जि. सांगली.

१८) मुळे, कमल - भारतीय खेडी आणि जाती, विचार प्रकाशन, औरंगाबाद, प्रकाशन वर्ष - १९७६.

१९) मोडक श्रीधर आणि मलाबादे के.एल. - आपल्या नगरपालिका कशा आहेत, कशा असाव्यात, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, प्रकाशन वर्ष - १९९२.

२०) दास्ताने, संतोष - महाराष्ट्र १९९२, महाराष्ट्र, १९९३, प्रकाशक - दास्ताने आणि कंपनी, पुणे.

२१) देशपांडे, एम्.डी. - पंचायत राज्य परिवर्तनाचे नवे पर्व, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, प्रकाशन - ऑगस्ट, १९८९.

२२) पाटील, जे.एफ. - सहकारातील आरिष्ट, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी.

२३) पाटील, पी.बी.(संपा.)- पंचायत राज्य, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास परिसंवाद, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९६२.

२४) पाटील पी.बी. - पंचायत राज्याकडून ग्रामस्वराज्याकडे, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, प्रकाशन, सप्टेंबर, १९९४.

२५) पाटील, बी.टी. (प्रकाशक) - आमदार श्रीपतराव शिंदे कार्यवृत्तांत अंक, प्रकाशन - १९९०.

२६) पाटील, रा.तु. - सांगली साता-याचे राजकारण, परखड प्रकाशन, तडसर, जि. सांगली. प्रकाशन वर्ष - १९८६.

२७) पानसरे, गोविंद - पंचायत राज्याचा पंचनामा, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, प्रकाशन वर्ष - १९९१.

२८) फडणीस ज्ञान - शेकाप - शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, पहिली आवृत्ती - १९७८.

२९) फडणीस, ज्ञान - १९९१ मधील निवडणूका, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, प्रकाशन वर्ष - जुलै, १९९१.

३०) फडणीस ज्ञान - शरद पवार धोरणे आणि परिणाम, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रकाशन - जानेवारी, १९९५.

३१) सरदार, ग.बा.(सं.) - महाराष्ट्र जीवन - परंपरा, प्रगती आणि समस्या, खंड पहिला, आवृत्ती पहिली, मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, प्रकाशन - १९७२.

३२) व्होरा राजेंद्र आणि पळशीकर, सुहास - महाराष्ट्रातील सत्तांतर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९५.

## संदर्भ लेख


१) चौसाळकर, अशोक - सहकार आणि राजकारण, समाज प्रबोधन पत्रिका. अंक १२० जुलै-सप्टेंबर १९९२ पृष्ठ नं. ११८ ते १२२

२) लेले, जयंत - मराठ्यांचे धुरिणत्व समाज प्रबोधन पत्रिका. अंक १११ एप्रिल-जून १९९० पृष्ठ नं. ५७ ते ६४

३) गुरु, गोपाळ - साखर कामगार चळवळ, समाज प्रबोधन पत्रिका. अंक १२० जुलै-सप्टेंबर १९९२ पृष्ठ नं. १२३ ते १२९.


## अप्रकाशित शोधनिबंध


३३) गायकवाड, र.रा. - सातारा तालुक्यातील पक्षीय राजकारण, इ.स.१९७७ ते १९८७, शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्.(राज्यशास्त्र) पदवी परीक्षेसाठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिबंध, मे, १९९०.

३४) पाटील, आ.रा. - कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँक - एक राजकीय अभ्यास, शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. (राज्यशास्त्र), पदवी परीक्षेसाठी सादर केलेला अप्रकाशित शोध निबंध, १९८९.

३५) शेंडे, ज.दा. - फलटण तालुक्यातील पक्षीय राजकारण, एक टीकात्मक अभ्यास (इ.स.१९७७ - १९८५) शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्.(राज्यशास्त्र) पदवी परीक्षेसाठी सादर केलेला अप्रकाशित शोध निबंध, मे, १९८७.

## प्राथमिक साधने - वर्तमान पत्रे

दैनिक सकाळ, कोल्हापूर, दैनिक पुढारी, कोल्हापूर, दैनिक तरुण भारत, कोल्हापूर, दैनिक सत्यवादी, कोल्हापूर, दैनिक केसरी, सांगली, दैनिक महासत्ता, इचलकरंजी, स्मरणिका, समाज प्रबोधन पत्रिका, साप्ताहिक सृष्टी, गडहिंग्लज, हिरण्यकेशीच्या काठी - १९८९.

## वार्षिक अहवाल

गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याचे वार्षिक अहवाल, गडहिंग्लज नगरपालिका वार्षिक अहवाल, पंचायत समिती, गडहिंग्लज कार्यालयीन माहिती इ.

.....

## (B) Reference Books


1) Baviskar, B.S. - The Politics of Development, Sugar Co-operatives in Rural Maharashtra, Oxford University Press, New Delhi, 1980.

2) Carras, M.C. - Dynamies of Indian Political Factions, Cambridge University Press, 1972.

3) Choudhari, Rekha - Ideology and Politics of Ruling Parties in India, Deep & Deep Publications, New Delhi, 1991.

4) Inamdar, N.R. - Government and Co-operative Sugar Factories, Popular Prakashan, Bombay, 1965.

5) Inamdar, N.R.(Ed.)- Contemporary India, Political Processer Continetal Prakashan, Poona, 1982.

6) Jha Shiva Chandra - Indian Party Polities, Deep & Deep Publications, New Delhi, 1989.

7) Kavlekar, K.K. Chousalkar, A.S. (Ed.) - Ideas Movements and Politics in India, Ajab Pustakalaya, Kolhapur, 1986.

8) Kothari Rajani (Ed.) - Caste in Indian Politics, Orient Longman limited, New Delhi, 1970.

9) Lele, Jayant - Elite, Pluralism and Class Rule, Political Development in Maharashtra, Popular Prakashan, Bombay, 1982.

10) Moin, Shakir - State and Politics in Contemporary India, Ajanta Publications, Delhi, 1986.

11) Omeadf, Gail - Revolution and Rural Protetariat in contemporary Western India, Sacpan University of British Columbia, 1972.

12) Phadke, Y.D. - Politics and Language, Himalaya Publicity House, Bombay, 1979.

13) Sirsikar, V.M. - The Rural Elite in Developing Society, Orient Longman, New Delhi, 1970.

14) Sirsikar, V.M. - Government and Politics in Maharashtra, Orient Longman, New Delhi, 1992, Thakkar U. and Kulkarni M. (Ed.), Polities in Maharashtra, Himalaya Publishing House, Bombay, 1995.

## (C) Unpublished M.Phil. and Ph.D. Thesis


1) Deshmukh, S.K. - "Emergence of Agro-Industrial Society and Political Development in Maharashtra a critical study of Political, Ideas of Y.B. Chavan", Unpublished M.Phil. Dissertation submitted to the Shivaji University, Kolhapur, 1984.

2) Jadhav, S.S. - "Congress Party and Peasant Movement in Maharashtra, from 1930 to 1950", Unpublished Ph.D. Thesis submitted to the Shivaji University, Kolhapur, 1994.

3) Patil, S.J. - "Local Patterns of Rural Politics in Maharashtra, A Study of Polities of Co-operative and Ranchayat Raj Institutions in Sangli District." Unpublished Ph.D. Thesis submitted to the Shivaji University, Kolhapur, 1987.

4) Powar, S.V. - Co-operative Leadership and Politics in Rural Maharashtra, Unpublished Ph.D. Thesis submitted to the Shivaji University, Kolhapur, 1982.


......